नवाकाळ शब्दकोडे-४३३



आडवे शब्द –

१. नेत्रहीन २. शेवटचा, अखेरचा ६. त्रासदायक ९. ध्वनिवर्धक १०. कुरागत, आगळीक ११. गुप्त चर्चेसाठी राखून ठेवलेले दालन १४. लोचट १६. विष्णूची पत्नी १८. पिठूळ पदार्थ १९. भय २०. खाद्यपदार्थ विकणाऱ्यांची गर्दी असलेली पेठ २२. प्रसन्न चेहऱ्याचा २५. हिरवे रत्न २७. भाडेकरार २९. बिनमिठाचा स्वयंपाक ३०. इच्छा ३२. निर्दय ३५. चुकीचा सल्ला ३६. विकत घेणे ३७. पुरुष ३८. आलिंगन ३९. प्रघात ४१. कामाचा कंटाळा ४३. वर्षाचा बारावा भाग ४५. विक्रम राजाला पंचवीस गोष्टी सांगणारा ४६. लागू केलेला नियम ४८. नौका ४९. गोल आकाराचा ५०. वैशिष्ट्यपूर्ण ५२. काज, कार्य, हेतू ५४. उपवासाला चालणारा गोडसर कंद ५६. लोण्यापासून तूप बनवण्याची प्रक्रिया ५८. ज्येष्ठ ५९. लहान मूल ६०. सार्वजनिक वाहतूकीचे अवजड वाहन ६२. आवड ६३. आघाताची त्वचेवर उमटलेली खूण ६४. मालदार आणि रगेल ६७. टीकाकार ६८. अग्नी, अनल ६९. दीर्घकाळ टिकणारे ७१. दताशी निगडित भारतातील एक प्राचीन वृक्ष, औदुंबर ७२. चरण, पद ७३. मनाप्रमाणे होईल की नाही याची भीती ७६. लग्न न झालेला ७७. वानराची एक जात ७९. मलई ८०. कगोल ८१. खंदक ८२. संस्कृत भाषा ८३. फावटे ८५. बोजड, अवाढव्य ८६. पत्नी ८७. न्यारा ८८. साखरेचा रस ९०. खात्री करून घेणे ९१. बाजू ९२. झाडू ९३. भातावी पेज ९४. शेळी ९५. पालेभाजीची गड्डी ९६. प्रकृती ९७. दोन चांगल्या गोष्टी एकत्र जुळून येणे १००. भात शिजवण्याचे मोठे भांडे १०१. लक्ष, अंतःकरण १०२. सांप्रत १०३. धांदल, गडबड

उभे शब्द – १. डगला, कोट २. गुप्त गोष्टी या अर्थाने वापरला जाणारा शब्द ३. रेपेदार जाड व मऊ कापड ४. अंकुर ५. वारा घेण्याचे साधन ७. हुशारी ८. तीव्र वेदना, यंत्रातील बटन ९. तलवारीपेक्षा छोटे अर्धचंद्राकृती शस्त्र १२. शेवट १३. चिंकित्सा, छाननी १५. गंभीर प्रमाद १७. आई २१. गलका २२. खंत २३. मऊ, मृद् २४. सखोल चर्चा २६. पसरलेला सुगंध २८. द्वितीय ३१. स्पर्धा ३३. आडाखा, तर्क ३४. पांढऱ्या पाकळ्या व केशरी देठ असलेल्या सुगंधी फुलांचे झाड ४०. पंढरीची पायी यात्रा ४१. कंडी, अफवा ४२. सोबत, संगतीने ४४. कल्याण, फायदा ४५. विळखा, वेढा ४७. हास्य ४८. नाविक ४९. खिडकी, गवाक्ष ५०. मावशीचा मुलगा ५१. अतिशय कंजूष ५२. गोजी, पाडी ५३. मधूर ५५. खड्डा ५७. शैली ५९. हस्तलिखित ६१. स्त्रीलिंगी भूत, हिच्या हाकेला ओ देणारा मरतो अशी समजूत आहे ६४. आय, झळ ६५. ढोंगी ६६. उपवन, बाग ६८. उत्पन्न ७०. कलाकुसरीची कामे करणारा ७२. लेंगा ७३. रामायणातील सुरुवातीचा भाग ७४. बाटलीचे रबरी झाकण ७५. लांब चोचीचा पक्षी ७७. तरट ७८. लक्षावधी ७९. शिकाऱ्याचे लक्ष्य ८४. रेघ, रेषा ८५. रामकथेतील वनवासाचा भाग ८७. लायकी ८९. कृत्रिम दंतसंच ९१. भांडकुदळ स्त्री ९३. जठराच्या खालचा लांबलचक अवयव ९२. फुलझाडे लावण्याचे मातीचे भांडे ९४. रामाची राजधानी ९५. अन्याय, अत्याचार ९७. माजलेला ९८. रक्तवाहिनी ९९. त्वचेवरचे सूक्ष्म केस •

नवाकाळ कोडे क्रमांक ४३२ चे उत्तर

आडवे शब्द : १. प्रखर ५. गुहा ६. गोपीचंदन १०. भगाण ११. कोरडे पाषाण १३. नाठाळ १४. राख १५. रण १६. चाप १७. रान १८. वंचित १९. दाटी २०. अपराध २२. हरित २४. लकेर २६. फूल २७. रवी २९. वश ३१. जंगली ३२. माल ३३. रांग ३५. खलबत्ता ३६. छत्री ३७. तळपाय ३७अ. दगड ३८. तंबी ३९. आवार ४१. नावाजलेला ४४. भिंग ४५. खरारा ४६. आरूढ ४९. थाळी ५०. डग ५२. सणवार ५३. ग्राहक ५५. आळी ५६. सूतोवाच ५८. मासल५९. रगड ६२. डरकाळी ६३. शर ६४. अंमळ ६५. प्रताप ६७. रमी ६८. डाक ७०. कथा ७१. सावली ७३. फक्त ७४. अमली ७५. कलकलाट ७८. वैर ७९. लागण ८१. रव ८२. दृश्य ८३. जीव ८४. सहनशीलता ८८. लेप ८९. मढ ९१. तीज ९३. कृश ९४. साध्य ९५. शेवंती ९६. लोटा ९७. मसनद ९९. असमान १०१. सद १०३. नव १०४. साक्षर १०५. टवका १०६. मरणासन्न १०७. रास्त

उभे शब्द : १. प्रयाण २. खण ३. पर ४. उपानह ५. गुणवंत ६. गोठा ७. पीळदार ८. दरा ९. मखरेल १०. भरपूर ११. कोपरा १२. डेरा १३. नातलग १६. चापट २१. धवल २३. रिक्षा २५. केली २६. फुलपाखरू २८. वीरांगना ३०. शबरी ३१. जंत्री ३२. माळ ३४. गडवा ३५. खवले ३६. छबी ३७. तर ३८. तंगडतोड ३९. आरास ४०. वाराणसी ४२. जब ४३. लाथाळी ४६. आरमार ४७. ढकलाढकली ४८. संग्राम ५१. गवार ५४. करमणूक ५५. आड ५७. चकाकी ६०. गळ ६१. भारा ६३. रामी ६५. प्रथा ६६. पसार ६७. रक्त ६८. डामडौल ६९. किंकर ७०. कट ७२. लीलावती ७३. फणस ७६. लवलेश ७७. लाभ ७८. वैश्य ८०. मौन ८२. दृढ ८५. हद ८६. शीर्षासन ८७. ताकद ८९. मध्यमा ९०. जिवंतिका ९२. जलोदर ९३. कृष्ण ९४. सासर ९८. नवरा ९९. अक्ष १००. नट १०१. सम १०२. क्रूस

चंद्रकांत खैरेंच्या मुलाची ऑडिओ क्लिप व्हायरल

पान १ वरून

ऋषिकेश खैरे हे युवासेनेचे जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आहेत. या ऑडिओ क्लीपमध्ये २ वर्षे झाली. बदलीचे कामही झाले नाही आणि माझे पैसेही परत मिळाले नाही, असे सांगत आहे. महाविकास आघाडीची सत्ता असताना हा व्यवहार झाल्याचा देखील या क्लिपमधून स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे ऋषिकेश खैरे यांनी देखील पैसे घेतल्याचे मान्य केले आहे.

पैसे देण्याबाबत गेल्या काही दिवसांपासून ऋषिकेश खैरे टाळाटाळ करत असल्याचे देखील या ऑडिओ क्लिपमध्ये समोर आले आहे. मात्र क्लिप व्हायरल झाल्यानंतर आता ऋषिकेश खैरे यांनी संपूर्ण प्रकरणावर स्पष्टीकरण दिले आहे. व्यवहाराचा विषय वेगळा आणि बदलीचा विषय वेगळा असे स्पष्टीकरणात खैरे यांनी दिले.

कोरोनाच्या आधी माझा एक मित्र बदली करण्यासाठी आला होता. ठाकरे सरकार असताना बदलीचे काम आहे तुम्ही करून द्या. मित्रांच्या जवळच कोणीतरी आला असल्याने काम करून देतो, असा शब्द दिला होता. पण अचानक कोरोना आला आणि त्यानंतर राज्यात राजकीय घडामोडी घडल्याने बदलीचे काम होऊ शकले नाही. पण त्यांचे काय पैसे माझ्याकडे असतील ते देण्यासाठी मी तयार असल्याचे ऋषिकेश खैरे म्हणाले.

तुकोबारायांबद्दलचे 'शब्द मागे घेतो' म्हणत धीरेंद्र महाराजांकडून माघार

■ नवी दिल्ली

कथित अध्यात्मिक गुरू धीरेंद्र महाराज यांनी संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्याबद्दल एक वादग्रस्त विधान केले

होते. यामुळे देशभरात मोठा गदारोळ माजला होता. मात्र तुकाराम महाराजांनी अन्नप्राशन केल्याशिवाय त्यांची पत्नी जेवण करत नव्हती, हा खरा इतिहास आहे. त्यामुळे चुकीचा इतिहास पसरवू नका. तुम्हाला जर खरी माहिती घ्यायची असेल तर देहू मध्ये या आणि तुकाराम महाराजांची माहिती घ्या, अशा शब्दात देहू संस्थानने धीरेंद्र महाराजांना सुनावले होते. त्यानंतर त्यांनी नमते घेत आपले हे विधान मागे घेतले आहे.

काही दिवसांपूर्वी धीरेंद्र महाराजांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यामध्ये त्यांनी संत तुकाराम महाराजांबद्दल बोलताना, त्यांची बायको त्यांना रोज मारायची, त्यामुळे ते देव देव करायला लागले, असे विधान केले आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर महाराष्ट्रात सर्वत्र संताप व्यक्त करण्यात आला होता. त्यानंतर आता धीरेंद्र महाराजांनी म्हटले की, संत तुकाराम हे महान आहेत. आमचे आदर्श आहेत. मी एका कथेमध्ये त्यांच्या पत्नीचा एक दाखला दिला होता. त्यांची पत्नी थोड्या विचित्र स्वभावाची होती, ही गोष्ट मी एका पुस्तकात वाचली होती. पण माझ्या या दाखल्यामुळे वारकरी पंथाच्या लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या. त्यासाठी मी त्यांना इतकेच सांगू इच्छितो की, त्यांनी आपल्या मनात कुठलीही कटुता ठेऊ नका, मी माझे शब्द मागे घेत आहे.

एअर इंडिया लघुशंकाप्रकरणी मिश्राला जामीन

■ नवी दिल्ली

एअर इंडियाच्या विमानात सहप्रवाशावर लघुशंका केल्याचा आरोप असलेल्या शंकर मिश्राचा दिल्ली सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणी निर्णय देणारे अतिरिक्त सत्र न्यायाधीश हरज्योतसिंग भल्ला यांनी शंकर मिश्रा यांना एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे.

सोमवारच्या सुनावणीत न्यायाधीशांनी जामीन अर्जावरील निर्णय राखून ठेवला होता. मात्र आता तब्बल २५ दिवसांनी शंकर मिश्राची तुरुंगातून सुटका होणार आहे.

बीबीसीच्या माहितीपटाला चीनचा निधी? संसदेत आरोप

■ नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील बीबीसी डॉक्युमेंटरीवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे राज्यसभा खासदार आणि ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी यांनी आरोप केला आहे की, बीबीसीने तयार केलेल्या माहितीपटासाठी चीनच्या हवाई या कंपनीकडून अर्थसहाय्य घेतले आहे. भारतीय जनता पक्षाचे खासदार आणि ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी यांनी आरोप केला आहे की, बीबीसीला पैशांची अत्यंत गरज होती. त्यामुळे त्यांनी मोदींवरील माहितीपट तयार करण्यासाठी ते चीनशी संबंधित हवाई या कंपनीकडून पैसे घेतले आहेत. ऑगस्ट २०२२ मध्ये युके मॅगझिन द स्पेक्टेटरमध्ये प्रकाशित झालेल्या एका लेखाची लिंक भाजप खासदार जेठमलानी यांनी शेअर केली.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड

जाहीर सूचना

२२/२२ के.व्ही. तेजग्री स्विचींग स्टेशन मधून निघणारी खालील वाहिनी देखभाल व दुरूस्तीचे कामाकरिता दि.०१.०२.२०२३ रोजी बंद राहणार असुन या काळात कल्याण (पूर्व) विभागामधील खालील परिसरातील विद्युत पुरवठा पूर्णपणे बंद राहील याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व म.रा.वि.कंपनीस सहकार्य करावे ही विनंती.

वाहिनीचे नाव	वेळ	प्रभावित क्षेत्र
२२ के.व्ही. छाया टॉकीज वाहिनी	सकाळी १०.०० ते दुपारी १६.००	बालघुनी शाखेतंर्गत अशोक नगर, इंदीरा नगर, शिवाजी नगर, नेनेवाडी

कार्यकारी अभियंता, कल्याण (पूर्व) विभाग

ईक्वान्स इलेक्ट्रिक लिमिटेड सीआयएन: L74999MH1951PLC008715
४४० ऑर्चिड मॉल, ३ रा मजला, रॉयल पाल्म्स ड्राइटेट,
आरे मिल्क कॉलनी, गोरेगांव (पू) मुंबई ४०००६५.

इक्विटी समभागाच्या बोनस इश्यूकरिता रेकॉर्ड दिनांकाची सूचना

संचालक मंडळाने **शुक्रवार, दि. १६ डिसेंबर, २०२२** रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेमध्ये कंपनीच्या भागधारकांची रेकॉर्ड दिनांकाच धारण केलेल्या रु. १०/- (रुपये दहा) प्रत्येकी मूल्याच्या प्रत्येक १ (एक) विद्यमान इक्विटी समभागाकरिता रु. १०/- (रुपये दहा) प्रत्येकी च्या १ (एक) नवीन इक्विटी समभागाच्या प्रमाणात इक्विटी समभागाचे बोनस इश्यूची शिफारस केली होती, जी भागधारकांच्या मंजुरीच्या अधीन आहे. कंपनीने भागधारकांच्या मंजुरीकरिता दयाली मतदान आयोजित केले आहे जे **दि. २५.०१.२०२३** रोजी समाप्त होत आहे. दयाली मतदानाकरिता स्क्रुटिनायझर यांच्या अहवालाच्या अनुषंगाने, सदर ठराव आवश्यक बहुमताने मंजूर केले आहेत.

कंपनी कायदा, २०१३च्या कलम ९७ सहवाचित त्याअंतर्गत बनलेल्या नियमांच्या अनुषंगाने आणि बोनस समभागांकरिता हकदारदार असणाऱ्या इक्विटी भागधारकांची नावे निश्चित करण्याकरिता, संचालक मंडळाने **मंगळवार, ३१ जानेवारी, २०२३** रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेमध्ये शुक्रवार, **१० फेब्रुवारी, २०२३** हा दिनांक "रेकॉर्ड दिनांक" म्हणून निश्चित केला आहे. कंपनीच्या सदस्य नोंदपत्रामध्ये किंवा डिपॉझिटरीजच्या नोंदीमध्ये रेकॉर्ड दिनांकास लाभार्थी मालक म्हणून नावे आहेत अशा कंपनीच्या इक्विटी भागधारकांना बोनस इक्विटी समभागांचे वाटप केले जाईल.

वरील तपशील कंपनीची वेबसाईट http://evanselectric.co.in आणि कंपनीचे भाग जेथे सूचिबद्ध आहेत त्या स्टॉक एक्सचेंजच्या म्हणजेच दि बीएसई लिमिटेडच्या वेबसाईट www.bseindia.com येथे देखील उपलब्ध आहे.

ईक्वान्स इलेक्ट्रिक लि.करिता
सही/-
दिनांक: ०१ फेब्रुवारी, २०२३ एमडी नेल्सन फर्नांडिस, डीआयएन: ००९५५२८१

महागाई वाढणार! इतर देशांपेक्षा परिस्थिती चांगली

पान १ वरून

अर्थव्यवस्थेबाबत आर्थिक पाहणी अहवालात सकारात्मक अंदाज वर्तवण्यात आला आहे. अर्थव्यवस्थेची पाळेमुळे मजबूत असल्याने अर्थव्यवस्था वेगाने उभारी घेईल, असा विश्वास आर्थिक सर्वे क्षणात व्यक्त करण्यात आला आहे. नॉमिनल जीडीपी ११% राहील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. भांडवली खर्चात झालेली प्रचंड वाढ, लघु उद्योजकांना अर्थसहाय्य, कॉर्पोरेटची दमदार कामगिरी आणि वस्तूंचा वाढता खप तसेच स्थलांतरित कामगार पुन्हा शहरांकडे परतल्याने अर्थचक्राला वेग आल्याचे अहवालात म्हटले आहे. क्रयशक्तीच्या आधारे भारत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था आहे. तर चलनविनिमय दराचा विचार केला तर भारत पाचवी मोठी अर्थव्यवस्था असल्याचा दावा आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त करण्यात आला आहे.

आर्थिक पाहणी अहवालात रुपयाच्या अवमूल्यनाबाबत चिंता करण्यात आली आहे. वित्तीय तूट वाढल्यास रुपयावरील दबाव वाढेल, असे अहवालात म्हटले आहे. मात्र परकीय चलन साठा वाढेल, असा विश्वास देखील व्यक्त करण्यात आला आहे. चालू खात्यातील तूट भरून काढण्यासाठी पुरेसा परकीय चलन साठा असल्याचा दावा आर्थिक पाहणीमध्ये करण्यात आला आहे.

PUBLIC NOTICE

Shri. Devoo Gangaram Jadhav member of Mahapalika laghuvetan K.S.G.S.M Ekatmata Nagar, J.B. Nagar Andheri (E) and holding Flat in Bldg no 6A / 15 of the society, died on 13/12/2019 without making any nomination. The society hereby invites claims and objections from heir or other claimants within period of 7 days from the publication of this notice. If no claims/objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member as per bye laws. A copy of registered bye laws of the society is available for inspection by the claimants/objectors in the office between 11:30am to 4:00pm from date of publication of this notice.

Secretary
Mahapalika L.K.S.G.S.M, Andheri

एमपीएससी विद्यार्थ्यांना दिलासा नवा परीक्षा पॅटर्न २०२५ पासून

पान १ वरून

करण्याबाबत मंगळवारी पुण्यातील अल्का टॉकीज चौकात एमपीएससी विद्यार्थ्यांनी अराजकीय साष्टांग दंडवत आंदोलन केले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अलका टॉकीज चौकात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. १३ जानेवारीला देखील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. अखेर विद्यार्थ्यांच्या मागणीला यश मिळाले आहे. ही मागणी मान्य झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी केलेल्या आंदोलनाचा हा विजय आहे. आजचा दिवस आमच्यासाठी दिवाळीसारखा आहे. या निर्णयासाठी सरकारचे आभार मानतो. आता जोमाने अभ्यासाला लागू, अशी प्रतिक्रिया आंदोलक विद्यार्थ्यांनी दिली.

भाजपाची उडी

आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी एमपीएससीच्या उमेदवारांनी केलेल्या अराजकीय साष्टांग आंदोलनात भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार अभिमन्यू पवार सहभागी झाले. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन लावला. सरकारकडून तत्काळ आश्वासन मिळाले आणि मंत्रिमंडळ बैठकीत निर्णयही झाला. एमपीएससी विद्यार्थ्यांचे हे आंदोलन यशस्वी झाल्याचे श्रेय पडळकर आणि पर्यायाने भाजपाला मिळावे यासाठी त्यांची धडपड सुरू होती का, अशी चर्चा होती.

अनिल परब भडकले! म्हाडाला घेराव किरीट सोमय्या अर्ध्या वाटेतून परत

पान १ वरून

प्रयत्न केला. यावेळी पोलीस व शिवसैनिकांत जोरदार बाचाबाची झाली. काही शिवसैनिक पोलिसांचे व खासगी सुरक्षा रक्षकांचे कडे तोडून घुसले आणि त्यांनी दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या माळ्यावर घोषणा देत ठिय्या आंदोलन केले. यावेळी भवनाच्या प्रत्येक मजल्यांवर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. म्हाडाचे तिन्ही प्रवेशद्वार बंद करण्यात आल्याने म्हाडा कर्मचारी व अभ्यंगत बाहेरच अडकून पडले होते. अक्षरशः गोंधळ सुरू होता.

यानंतर अनिल परब यांच्यासोबत शिवसेनेच्या शिष्टमंडळाने म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांची भेट घेतली. अनिल परब अक्षरशः चिडले होते. त्यांनी बोरिकरसह म्हाडाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. अनिल परब म्हणाले की, मी कार्यालयाचे बांधकाम स्वतःहून पाडत असताना पुन्हा नोटीस का दिली. किरीट सोमय्या म्हाडाचा मालक आहे का? असे सुनावले. परब यांनी तब्बल पाच तास अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. यानंतर परब संध्याकाळी अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून दालनातून बाहेर आले. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले गांधीनगर इमारत क्रमांक ५७ व ५८ मध्ये मोकळ्या जागेत असलेले कार्यालय सोसायटीच्या मालकीचे आहे. माझा या कार्यालयाशी काडीमात्र संबंध नाही. तसे पत्र आज मला म्हाडाने लेखी स्वरूपात दिले आहे. तरीही हे कार्यालय माझे आहे, अशी बदनामी करत भाजपाचे किरीट सोमय्या बोंबलत आहेत. माझी बदनामी करत आहे. त्याच्या विरुद्ध मी कोर्टात अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार आहे. म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी मला क्लीनचिट दिली आहे, असे अनिल परब म्हणाले.

अखिल भारतीय मराठा महासंघ
शिवनेरी सभागृह, शिवाजी मंदिर तळमजला,
न. चि. केळकर रोड, दादर, मुंबई 28

सर्व सभासदांना सूचना

अखिल भारतीय मराठा महासंघाच्या 2023-26 या त्रैवार्षिक निवडणूकीत पदाधिकारी निवड करण्याच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तसर व जाहिर करीत आहोत.

मुख्य निवडणूक कार्यालय : शिवनेरी सभागृह, शिवाजी मंदिर, दादर (प), मुंबई 28
महासंघाचे पदाधिकारी : 1 अध्यक्ष, 1 विभागीय उपाध्यक्ष, 1 सरचिटणीस, 1 कोषाध्यक्ष, 1 विभागीय चिटणीस
मतदार यादी जाहिर करणे : दि. 30/01/2023 दु. 1.00 ते सायं. 7.00 (संस्थेचे कार्यालय)
उमेदवारी अर्ज : दि. 02/02/2023 ते दि. 08/02/2023
उमेदवाराने अर्ज स्विकारणे : स्वतः उमेदवार दि.03/02/2023 ते दि. 08/02/2023 दु. 1.00 ते सायं. 7.00
उमेदवारी अर्ज छाननी : दि. 09/02/2023
उमेदवारी अर्ज माघार: दि. 10/02/2023
पात्र उमेदवार अंतिम यादी : दि. 12/02/2023 दु. 3.00 वा. (बोर्डावर लावली जाईल)
गरज पडल्यास निवडणूक : दि. 13/02/2023 सायं. 5.00 नंतर
मतमोजणी : दि. 13/02/2023 सायं. 5.00 नंतर
वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक निकाल जाहीर वार्षिक सभेत : दि. 13/02/2023 सायं. 6.00 वा.

नियम :
1) उमेदवार महासंघाचा सभासद असला पाहिजे.
2) अर्जासोबत 1 सुचक 1 अनुमोदक असावेत ते महासंघाचे सभासद पाहिजेत. त्यांना सभासद असल्याची ओळख पटवावी लागेल.

दि. 30-01-2023 सरचिटणीस
अखिल भारतीय मराठा महासंघ

गजानन गंगामाई इंडस्ट्रीज एलएलपी
परिसमापकाचा पत्ता - सत्रनिका क्र. ४०२, पलाझिओ सीएनएल इमारत २३ई, एस. एन. रोड्स स्टेशनजवळ, ठाणे, मुंबई ४०००६५.
पत्रव्यवहाराचा पत्ता: रेमानेल्स इन्सॉल्व्हन्सी रेझॉल्यूशन प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड, ७०१, कनाकिया ॲट्रिन २, क्रॉस रोड ए, चकाला एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३.
संपर्क: +९१ ९०८२१५२०८; ईमेल: liq.ggil@rirp.co.in, kamalgurnaniip@gmail.com

ई-लिलाव - आयबीसी, २०१६ अन्वये संपत्तीची विक्री
लिलावाचा दिनांक आणि वेळ : दि. ३ मार्च, २०२३ (शुक्रवार) स. १०.०० ते दु. ११.०० (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

परिसमापन प्रक्रिया विनियमनाच्या विनियमन ३३ सह वाचावयाच्या आयबीसी, २०१६ च्या कलम ३५ (एफ) अन्वये परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या गजानन गंगामाई इंडस्ट्रीज एलएलपी (परिसमापनामध्ये) च्या संपत्तीची ई-लिलाव विक्री. ई-लिलाव जसे आहे जेथे आहे, जसे आहे ने आहे, **तेथे ने आहे आणि कोणत्याही आधारशिवाय तत्त्वावर** आयोजित करण्यात येईल.
निम्नस्वाक्षरीकारांद्वारे विक्री ई-लिलाव सेवा पुरवठादार **मेसर्स ई-नाइर्वाना सॉल्यिंस लिमिटेड** यांच्या मार्फत वेबसाईट http://www.pda.nesl.co.in मार्फत करण्यात येईल.

(रक्कम भारतीय रुपयांमध्ये)

अ. क्र.	संपत्ती	राखीव किंमत	ईएमडी रक्कम	विस्तार योग्य बोली रक्कम
अ.	पार्सल्समध्ये संपत्तीची विक्री लिलावाचा दिनांक आणि वेळ: ३ मार्च, २०२३ रोजी स. १०.०० ते ११.००			
१.	प्लॉट क्र. सी-१३, सिंबाला, हिंगोली (१५,४७,५०,००० एमआयडीसी, तालुका आणि जि. हिंगोली, महाराष्ट्र येथील जमीन आणि इमारत आणि प्लान्ट आणि मशिनरी	१,५९,७५,०००	५०,००,०००	

पात्रता कागदपत्रांच्या साक्षीकरणाकरिता अंतिम दिनांक : दि. ५ फेब्रुवारी, २०२३ (शनिवार)
द्वारा नम्र एनरोल, साईट भेट आणि चर्चा समेकरिता दिनांक : दि. २७ फेब्रुवारी, २०२३ (सोमवार)
ईएमडी साक्षीकरणाकरिता अंतिम दिनांक : दि. १ मार्च, २०२३ (बुधवार) रोजी ई.५.०० वाजेपर्यंत
ई-निलावाचा दिनांक आणि वेळ: दि. ३ मार्च, २०२३ (शुक्रवार) स. १०.०० ते ११.०० दरम्यान
टीप : अनिलाईन निलावाच्या तपशीलवार अटी आणि शर्ती, ई-निलाव अर्ज आणि इतर तपशील https://www.pda.nesl.co.in वर उपलब्ध आहेत.
कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता, कृपया निम्नस्वाक्षरीकारांना iq.ggil@rirp.co.in येथे संपर्क साधावा.
दिनांक : १ फेब्रुवारी, २०२३ सही / -
ठिकाण: मुंबई कमल किशोर गुरनानी
दि. ११ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या आदेशानुसार
गजानन गंगामाई इंडस्ट्रीज एलएलपीचे परिसमापक
आयबीबीआय नोंदणीकरण क्र. IBBI/IP-001/IP/P- 01463/2018-2019/12338
नियुक्तीकरिता प्राधिकृतता दि. १४ डिसेंबर, २०२३ पर्यंत वैध
पत्रव्यवहाराचा पत्ता: रेमानेल्स इन्सॉल्व्हन्सी रेझॉल्यूशन प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड,
७०१, कनाकिया ॲट्रिन २, क्रॉस रोड ए, चकाला एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३.
ईमेल: liq.ggil@rirp.co.in